

तुषार सांगळे
यु.एस.ए., बोस्टन

दिल्ली येथील ६९ व्या अंतरराष्ट्रीय समागमाने सर्वांचे लक्ष वेधले आहे आणि आपल्या सर्वांना उत्सुकता सुध्दा आहे की सद्‌गुरु माताजी आपल्या वाणीतून काय मार्गदर्शन देतील. तर माझी वाचक वर्गाला हीच प्रार्थना आहे की आता वेळ आली आहे की आपण शब्द आणि त्यांच्या अवधीमध्ये अडकून राहण्याऐवजी सद्‌गुरुच्या सांगण्याचा भाव समजून घेऊया. तद्नंतरच आपल्या जीवनाची जी वाटचाल असेल ती सद्‌गुरुच्या सांगण्यानुसार असेल आणि प्रत्येक येणारा संत समागम आपल्यासाठी खऱ्या अर्थाने सार्थक ठरेल.

# कहने का भाव यह है...

१ ऑक्टोबर २०१६ या दिवशी सद्‌गुरु माता सविंदर हरदेवजींनी सद्‌गुरु रुपामध्ये प्रकट झाल्यानंतर पहिल्यांदाच मानव कल्याणयात्रेसाठी प्रवासास आरंभ केला.आपणा सर्वांनाच ज्ञान असेल की चंदिगढ या शहरामध्ये संतसमागमाचे आयोजन केले गेले. ह्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण निरंकारी मिशनच्या वेबसाईटवर करण्यात आले. मला फार उत्सुकता होती की आज सद्‌गुरु माताजी आपल्या अमृतवाणीतून काय आशीर्वाद देतील. माताजींचे विचार ऐकल्यानंतर माझ्या चेहऱ्यावर स्मितहास्य आले. मला या गोष्टीची पुन्हा एकदा अनुभूती झाली की ही तीच वाणी आहे जी सद्‌गुरु बाबा हरदेवसिंहजींच्या रुपामध्ये आपल्या सर्वांना मार्गदर्शन देत होती. सद्‌गुरु माताजींनी विशाल जनसमुहाला संबोधित करताना हेच उद्‌गार काढले की, "तुम्ही या ठिकाणी इतक्या विशाल संख्येने येणे याचे कारण म्हणजे तुमचे बाबा हरदेवसिंहजी महाराजांप्रति असलेलं प्रेम आहे." हे वाक्य ऐकल्यानंतर माझ्या अंगावर शहारे आले आणि एक गोष्टीची समज प्राप्त झाली की परत एकदा सद्‌गुरुने मानवमात्राला अकर्तेपणाचा भाव अंगीकारण्याची शिकवण दिली आहे. पहायला गेले तर इतका मोठा मानव समाज केवळ सद्‌गुरु बाबा हरदेवसिंहजीच्या प्रेमापोटीच नव्हे तर खास करुन सद्‌गुरु माताजींच्या दर्शनासाठी आला होता; पण त्यांनी कर्ताभाव न स्वीकारता याचे सारे श्रेय बाबा हरदेवसिंहजी महाराजांना आणि या निराकार प्रभू-परमात्म्याला दिले. काही असेच झाले होते तब्बल ३०-३५ वर्षांपूर्वी, आणि म्हणून दासने सुरुवातीला या गोष्टीचा उल्लेख केला की मला हा अनुभव आला की ही तीच वाणी आहे जी मानव समाजाला सद्‌गुरु माताजींच्या माध्यमातून मार्गदर्शन देत आहे. कोणी तरी बाबा हरदेवसिंहजी महाराजांना म्हणाले की, ज्यावेळेस मिशन एक कठीण परिस्थितीमधून जात होते त्यावेळेस तुमच्याचं अथक प्रयासांनी मिशनचे अनुयायी स्थिरावले आणि सावरले. यावर बाबा हरदेवसिंहजी महाराज म्हणाले, 'हे सर्व यामुळे शक्य झाले कारण महापुरुषांचे बाबा गुरबचनसिंहजींप्रति प्रेम आणि श्रध्दा होती. दासने तर फक्त बाबा गुरबचनसिंहजींची शिकवण परत एकदा जागृत केली आणि महापुरुष जे या शिकवणीला जागत होते ते परत एकदा या शाश्वत सत्या प्रति दृढ झाले."

पहायला गेले तर बाबा हरदेवसिंहजींनी सद्‌गुरु रुपामध्ये प्रकट झाल्यानंतर विश्वाच्या कानाकोपऱ्यामध्ये जाऊन मिशनच्या अनुयायांना प्रेमाचा, नम्रतेचा आणि स्थिरतेचा संदेश दिला पण ज्या वेळेस या सत्कर्माचे श्रेय स्वीकारण्याची वेळ आली त्यावेळी ते म्हणाले की हे सर्व तर बाबा गुरबचनसिंहजी आणि महापुरुषांचे त्यांच्याप्रति असलेल्या प्रेमामुळे शक्य झाले. छत्तीस वर्षांपूर्वी बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या या वाणीमध्ये आणि चंदिगढमध्ये सद्‌गुरु माताजींच्या प्रवचनामध्ये तीळमात्र सुध्दा अंतर नाही. शरीर बदलले आहे पण संदेश मात्र तोच

आहे की या एक प्रभू-परमात्म्याला जाणून त्याला कर्ता मानून सुंदर असे जीवन जगावे.

सद्गुरु माताजींची पहिली मानव कल्याण यात्रा चंदिगढमध्ये होणे ह्या मध्ये सुध्दा एक संदेश होता. हा त्या शहराला मान होता ज्या ठिकाणी मिशनचे अनन्य भक्त आदरणीय अवनीत सेतियाजी यांनी आपला बहुतांश जीवन काळ व्यतीत केला. सद्गुरु माताजींनी आपल्या विचारामध्ये या गोष्टीचा उल्लेख सुध्दा केला आणि शेवटी हे उद्गारसुध्दा काढले की, "निरंकार कृपा करो प्रत्येक घरात अवनीतजींसारखे प्रेमळ, नि:स्वार्थी आणि विश्वासू मूल असो." किती थोर असे जीवन असेल त्यांचे की स्वयम् सद्गुरु अशी प्रार्थना करत आहेत की, अशाप्रकारचा भक्त प्रत्येक घरात असो.

आजकाल सद्गुरु माताजी काही मोजक्या शब्दांचा प्रयोग करुन आपल्याला मार्गदर्शन करत आहेत. जर बारकाईने ऐकले तर ही गोष्ट कळते की ही तीच वाणी आहे जी बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या रुपामध्ये आपल्या सर्वांना मार्गदर्शन देत होती. फरक फक्त इतका आहे की, बाबा हरदेवसिंहजी महाराज २५-३० मिनिटाच्या प्रवचनानंतर म्हणायचे की, "साधसंगत, कहने का भाव यह है" आणि मग काही मिनीटामध्ये सर्व विचारांचा भाव सांगायचे जो भक्ताने जोपासने अपेक्षित होता. आज सद्गुरु माताजी काही मिनिटामध्ये तोच भाव आपल्याला सांगत आहेत.आता दिल्ली येथील ६९ व्या अंतरराष्ट्रीय समागमाने सर्वांचे लक्ष वेधले आहे आणि आपल्या सर्वांना उत्सुकता सुध्दा आहे की सद्गुरु माताजी आपल्या वाणीतून काय मार्गदर्शन देतील. तर माझी वाचक वर्गाला हीच प्रार्थना आहे की आता वेळ आली आहे की आपण शब्द आणि त्यांच्या अवधीमध्ये अडकून राहण्याऐवजी सद्गुरुच्या सांगण्याचा भाव समजून घेऊया. तदनंतरच आपल्या जीवनाची जी वाटचाल असेल ती सद्गुरुच्या सांगण्यानुसार असेल आणि प्रत्येक येणारा संत समागम आपल्यासाठी खऱ्या अर्थाने सार्थक ठरेल.

संकलक - अंकित चंद्रकांत जाधव